# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

जळगाव दि. १९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा व जी. टी. पाटील महाविद्यालयाचा स्वयंसेवक प्रतीक माधव कदम याला नुकताच राष्ट्रपती पुरस्कार जाहीर करण्यात आला. सदर पुरस्कार २४ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती भवनातील दरबार हॉल येथे महामहीम राष्ट्रपती यांच्या हस्ते सकाळी अकरा वाजता वितरित होणार आहे.

प्रतीक कदम याने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वृक्षारोपण, वन्यजीव संरक्षण, रक्तदान अभियान, डिजिटल इंडिया, स्वच्छता अभियान, जनधन योजना आदी बाबतीत भरीव काम केले. सोबतच २०२० -२१ मध्ये दिल्ली येथील राजपथावर २६ जानेवारी २०२१ प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या संचलनात महाराष्ट्राच्या वतीने कॉन्टिजंट कमांडर म्हणून नेतृत्व केले होते तर दिल्ली येथेच संपन्न झालेल्या युवा सांस्कृतिक महोत्सवात महाराष्ट्राची लावणी व बासरी वादन करून सांस्कृतिक प्रतिनिधित्व केले होते. दोन वर्षाच्या कालावधीत प्रतीक कदम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागातून आयोजित होणाऱ्या राष्ट्रीय एकात्मता उत्कर्ष सारख्या राज्य व राष्ट्रीय पातळीवरच्या विविध शिबिरांमध्ये सहभाग नोंदविला होता. कोविड काळात प्रतिक कदम याने स्वतः पाचशेपेक्षा अधिक मास घेऊन मजूर व दत्तक वस्तीत वाटप केले होते. तर, नंदुरबार सारख्या ग्रामीण आदिवासी जिल्ह्यातील नागरिक लसीकरण करण्यासाठी येते नव्हते तेव्हा तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ राजेंद्र भारुड यांचे सहकार्य घेऊन गावा गावात,वस्ती पाड्यावर जाऊन नागरिकांना लसीकरणासाठी पथनाट्य आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली होती. याच काळात २००० पेक्षा अधिक सापांना जीवदान देऊन त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडण्याचे काम केले होते, सर्पमित्र म्हणून प्रतीक कदम पूर्ण खान्देशात परिचित आहे.

या संपूर्ण कार्याची दखल घेऊन प्रतीक कदम या विद्यार्थ्याला राष्ट्रपती पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी प्रतिकचे अभिनंदन करताना सांगितले की विद्यापीठाच्या मानात एक मानाचा तुरा रोवला. त्याबद्दल प्रतिकचे मनःपूर्वक अभिनंदन. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी अभिनंदन केले, राष्ट्रीय सेवा योजनेचे तत्कालीन संचालक डॉ. पंकजकुमार नन्नवरे, विद्यमान संचालक डॉ. सचिन नांद्रे यांच्यासह विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कर्मचारी बांधव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.  व्ही. एस. श्रीवास्तव, प्राचार्य डॉ. एम.जे.रघुवंशी कार्यक्रम अधिकारी डॉ. अमोल भुयार व त्यांचे सर्व टीम यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

**<u>बातमी नं. २</u>**

जळगाव दि. १९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी व्याख्यानमालेत आहार तज्ज्ञ डॉ. प्रणिता अशोक (पुणे) यांचे ‘बदलती जीवनशैली आणि आहार’ या विषयावरील व्याख्यान शनिवार, दि. २४ सप्टेंबर रोजी दु. ४.०० वाजता ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्षस्थानी स्त्री अभ्यासकेंद्राच्या प्रभारी प्रमुख प्रा. रत्नमाला बेंद्रे या राहणार आहेत. हे व्याख्यान Zoom Link (Meeting ID: 97999486549, Passcode: Lifelong) होणार असून Youtube व facebook वरून सदरचे व्याख्यान ऐकता येईल. तरी सर्वांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी कळविले आहे.

**<u>बातमी नं. ३</u>**

जळगाव दि. १९ (प्रतिनिधी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक, सांस्कृतिक आणि धम्म चळवळ पुढे नेण्याचे कार्य भैय्यासाहेब आंबेडकरांनी केले असे प्रतिपादन प्रा. राकेश रामटेके (संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि) यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र सूर्यपुत्र यशवंतराव उर्फ भैय्यासाहेब आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलतांना केले.

....२

शनिवार, दि.१७ सप्टेंबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट विद्यापीठातील डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने हा अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुढे बोलतांना प्रा.रामटेके म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मानवमुक्तीची, सामाजिक परिवर्तनाची चळवळ यशवंतराव आंबेडकर यांनी आपल्या कार्य कर्तृत्वाने पुढे नेण्याचे कार्य केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विभाग प्रमुख प्रा.डॉ.अनिल डोंगरे, राज्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ.उमेश गोगडिया, व्यवस्थापन शास्त्रे प्रशाळेतील प्रा.मधुलिका सोनावणे, प्रा.पवित्रा पाटील, प्रा. रमेश सरदार, प्रा.यशोदीप पाटील, डॉ.प्रशांत सोनवणे, डॉ.अभय मानसरे, डॉ.गोपाळ पाटील, डॉ.समाधान कुंभार, डॉ. मनोज इंगोले, प्राध्यापिका महाले, प्राध्यापिका कविता पाटील, डॉ.अनिल तौर, अक्षय सपकाळे, कुणाल महाजन  इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रस्ताविक डॉ.विजय घोरपडे यांनी केले तर आभार डॉ.समाधान बनसोडे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:  १९ सप्टेंबर, २०२२

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी यांच्या करीता